**<u>ठळक बातम्या</u>**

- भारत- युके मुक्त व्यापार करारावर दोन्ही देशांच्या स्वाक्षऱ्या
- सहकारी संस्थांना समावेशी, रोजगार निर्मितीक्षम बनवणारं नवं राष्ट्रीय सहकार धोरण जाहीर
- मुंबई उपनगरी रेल्वे साखळी बॉम्बस्फोट प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयाची स्थगिती
- पुढचे चार दिवस महाराष्ट्र आणि पश्चिम बंगालच्या काही भागांसह, मध्य प्रदेश, छत्तीसगड, आणि ओदिशात मुसळधार पावसाची शक्यता

**आणि**

- इंग्लंडविरुद्धच्या चौथ्या कसोटी क्रिकेट सामन्यात भारताच्या पहिल्या डावात ३५८ धावा

**<><><><>**

भारत- युके दरम्यान मुक्त व्यापार करारावर आज स्वाक्षऱ्या झाल्या. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी ब्रिटीश प्रधानमंत्री कीर स्टार्मर यांच्याबरोबरची बैठक संपल्यावर संयुक्त निवेदनात ही माहिती दिली. या करारामुळे भारतीय वस्त्रं, पादत्राणं, मौल्यवान रत्नं, मासळी, प्रक्रीया केलेले खाद्यपदार्थ आणि अभियांत्रिकी उपकरणांना युकेमधली बाजारपेठ खुली होणार असल्याचं त्यांनी सांगितलं आणि कराराबद्दल समाधान व्यक्त केलं....

**- - होल्ड – बाईट- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी- -**

युरोपीय संघातून बाहेर पडल्यानंतर युकेच्या दृष्टीनं भारताबरोबरचा मुक्त व्यापार करार हा महत्त्वाचा आर्थिक करार असल्याचं युकेचे प्रधानमंत्री कीर स्टार्मर म्हणाले. या करारामुळे युकेमधे भारतीय उत्पादनं स्वस्त होतील. युकेच्या अर्थव्यवस्थेत दरवर्षी ४ अब्ज ८० कोटी पौंडाची वाढ अपेक्षित आहे.

**<><><><>**

मुंबई उपनगरीय रेल्वेत २००६ मध्ये झालेल्या साखळी बॉम्बस्फोट प्रकरणी सर्व १२ आरोपींची निर्दोष मुक्तता करण्याच्या मुंबई उच्च न्यायालयानं दिलेल्या निर्णयाला आज

सर्वोच्च न्यायालयानं स्थगिती दिली. मुंबई उच्च न्यायालयाच्या निकालाविरोधात राज्य सरकारनं सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती, त्यावर आज न्यायमूर्ती एम.एम. सुंदरेश आणि न्यायमूर्ती एन.के. सिंह यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. राज्य सरकारच्या वतीनं सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी न्यायालयात म्हणणं मांडलं. उच्च न्यायालयाच्या निकालातल्या काही निरीक्षणांमुळे मकोका अंतर्गत प्रलंबित असलेल्या इतर खटल्यांवर परिणाम होऊ शकतो, म्हणून या निर्णयाला स्थगिती द्यावी अशी विनंती त्यांनी केली. मात्र उच्च न्यायालयाच्या निकालानंतर तुरुंगातून सुटलेल्या आरोपींनी पुन्हा आत्मसमर्पण करावं अशी कोणतीही मागणी नसल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयानं मुंबई उच्च न्यायालयाच्या निकालाला स्थगिती दिली. तसंच, या सर्व आरोपींना पुन्हा तुरुंगात ठेवण्याची आवश्यकता नाही असं स्पष्ट केलं.

**<><><><>**

दिल्लीतल्या जवाहरलाल नेहरू विद्यापीठात छत्रपती शिवाजी महाराज सामरिक आणि संरक्षण विशेष अध्यासन केंद्राची पायाभरणी, तसंच ‘कुसुमाग्रज मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती विशेष केंद्राचं उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या हस्ते आज झालं. जवाहरलाल नेहरू विद्यापीठाच्या कुलगुरू शांतिश्री पंडित, राज्याचे मराठी भाषा मंत्री उदय सामंत, छत्रपती शिवाजी महाराजांचे वंशज बाबाजीराजे भोसले आदी मान्यवर या समारंभाला उपस्थित होते.

या अध्यासन केंद्राच्या स्थापनेची घोषणा गेल्या वर्षी राज्य सरकारनं केली होती, त्यासाठी १० कोटी रुपयांचा निधीही मंजूर केला होता. या अध्यासन केंद्राच्या माध्यमातून मराठी भाषेचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम, पदविका, मराठा साम्राज्याची सैन्य व्यूहरचना आणि किल्ले आणि तटबंदी यामधील पदवी, तसंच पीएचडीही करता येणं शक्य होणार आहे.

**<><><><>**

केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी आज नवी दिल्लीत राष्ट्रीय सहकार धोरण २०२५ जाहीर केलं. सहकारी संस्थांना समावेशी बनवणं, व्यावसायिकदृष्ट्या त्यांचं व्यवस्थापन करणं, आणि ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती करण्यासाठी त्यांना सक्षम बनवणं, हे या धोरणाचं उद्दिष्ट्य आहे. २०४७ सालच्या विकसित भारताचं ध्येय गाठण्यामध्ये या धोरणाची मोठी भूमिका राहणार असून त्याद्वारे तळागाळातल्या

व्यक्तीचा सहकारातून विकास साधण्यात येईल. असं शहा म्हणाले. या धोरणाच्या माध्यमातून डेयरी, फिशरी अशा विविध क्षेत्रात २ लाखांहून अधिक संस्था तयार होणार आहेत. माजी मंत्री सुरेश प्रभू यांच्या अध्यक्षतेखालच्या ४८ जणांच्या समितीनं हे धोरण तयार केलं आहे.

<><><><>

विविध मुद्द्यांवरून विरोधकांनी केलेल्या गदारोळामुळे संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज आजही दिवसभरासाठी तहकूब झालं. लोकसभेचं कामकाज सुरुवातीला दुपारी २ वाजेपर्यंत आणि त्यानंतरही गदारोळ सुरूच राहिल्याने अखेर दिवसभरासाठी तहकूब केलं गेलं.

राज्यसभेत आज उपाध्यक्ष हरिवंश यांनी नवनियुक्त सदस्य उज्ज्वल निकम यांना शपथ दिली. निकम यांनी मराठीतून शपथ घेतली.

आपला कार्यकाळ पूर्ण करणाऱ्या सहा निवृत्त सदस्यांनाही सभागृहात निरोप देण्यात आला. बिहारमध्ये मतदार यादी पुनरिक्षण आणि देशभरातल्या सायबर फसवणुकीसह विविध मुद्द्यांशी संबंधित ३० स्थगन प्रस्ताव उपाध्यक्ष हरिवंश यांनी फेटाळून लावले आणि प्रश्नोत्तराचा तास पुकारला. परंतु विरोधी पक्ष सदस्यांनी त्यांच्या मुद्द्यावर घोषणाबाजी सुरू केली. त्यामुळे कामकाज आधी दुपारी २ वाजेपर्यंत, आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

<><><><>

**राज्यात सहा फुटांहून** मोठ्या गणेशमूर्ती समुद्रात आणि नैसर्गिक जलस्त्रोतात विसर्जित करायला मुंबई उच्च न्यायालयानं परवानगी दिली आहे. मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती आलोक आराधे आणि न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या खंडपीठानं आज हे आदेश दिले.

<><><><>

महाराष्ट्र, ओदिशा, छत्तीसगडला हवामान विभागाने उद्या रेड अलर्ट जारी केला आहे. पुढचे चार दिवस कोकण, विदर्भासह महाराष्ट्राचा काही भाग, मध्य प्रदेश, छत्तीसगड, ओदिशा, पश्चिम बंगालमधला गंगेचा किनारी भाग आणि झारखंडमधे जोरदार ते अति जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे. हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, पूर्व राजस्थान, उत्तर प्रदेशमध्ये या महिन्याच्या शेवटपर्यंत जोरदार पाऊस पडेल असा अंदाज हवामान विभागाने

वर्तवला आहे. तर केरळ, दक्षिण कर्नाटकमधेही मुसळदार पाऊस पडण्याची शक्यता आहे. राजधानी दिल्लीत मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह हलक्या ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडेल, असं हवामान विभागानं कळवलं आहे.

<><><>

भारत आणि इग्लंड यांच्यातल्या कसोटी क्रिकेट मालिकेतल्या चौथ्या सामन्यात भारताचा पहिला डाव आज ३५८ धावांवर संपला. भारतानं कालच्या ४ बाद २६४ धावसंख्येवरून आज आपला डाव पुढं सुरू केला. मात्र शार्दुल ठाकूर आणि वॉशिंग्टन सुंदर यांच्यात सहाव्या गड्यासाठी झालेली ४९ धावांची भागिदारी वगळता, ठराविक अंतरानं भारताचे फलंदाज बाद होत गेले. काल जखमी झाल्यानं निवृत्त झालेला ऋषभ पंत आज ५४ धावांवर बाद झाला. इंग्लंडतर्फे बेन स्टोक यानं भारताचे ५ गडी बाद केले.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा इंग्लंडच्या पहिल्या डावात बिनबाद ७५ धावा झाल्या होत्या.

<><><>

चीन खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत महिला एकेरी प्रकाराच्या उपांत्यपूर्व फेरीत आज भारताच्या उन्नती हुडा हिने ऑलिंपिक पदक विजेत्या पी. व्ही. सिंधू हिचा २१-१६, १९-२१, २१-१३ असा पराभव केला. या विजयाबरोबर उन्नती ही चीन खुल्या बॅडमिंटन स्पर्धेच्या उपांत्य फेरीत पोहोचणारी सर्वात तरुण महिला खेळाडू ठरली आहे. या स्पर्धेच्या पुरुष दुहेरी प्रकारात सात्विकसाईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांनी आज इंडोनेशियाच्या लिओ रॉली कार्नांडो आणि बगास मौलाना यांचा सरळ गेममध्ये पराभव करत उपांत्यपूर्व फेरी गाठली. पुरुष एकेरीत एच. एस. प्रणॉय याला चायनीज तैपेईच्या चाऊ टिएन चेनकडून पराभव पत्करावा लागला.

<><><>

जॉर्जियात बटुमी इथं सुरु असलेल्या फिडे महिला बुद्धिबळ विश्वचषक २०२५ च्या उपांत्य फेरीत कोनेरु हम्पी आणि ली टिंगजी यांच्यात आज टायब्रेकर होणार आहे. काल त्यांच्यातला पहिला सामना अनिर्णित राहिला. भारताच्या दिव्या देशमुखनं काल चीनच्या टॅन झोंगी हिला हरवून अंतिम फेरीत स्थान मिळवलं. पहिला सामना अनिर्णित राहिल्यानंतर दुसऱ्या सामन्यात विजय मिळवून, दिव्यानं २०२६ मध्ये होणाऱ्या कॅंडिडेट्स स्पर्धेतही

स्थान मिळवलं आहे आणि तिचा पहिला ग्रँड मास्टर निकषही पार केला आहे. १९ वर्षांची दिव्या फिडे महिला विश्वचषकाच्या अंतिम फेरीत प्रवेश करणारी पहिली भारतीय खेळाडू ठरली आहे.

**<><><>**

रशियामधल्या पूर्व अमुर प्रदेशातल्या टिंडा इथं आज एक प्रवासी विमान कोसळलं. यातल्या प्रवासी आणि कर्मचाऱ्यांसह ४९ जण मरण पावल्याचं रशियातल्या प्रशासनानं कळवलं आहे. टिंडा इथल्या जंगलात विमानाचे अवशेष बचावपथकाला सापडले. या प्रकरणाची चौकशी सुरू आहे. विमान उतरत असताना कमी दृश्यमानतेमुळे हा अपघात झाल्याचं सांगण्यात येत आहे. विमान दुसऱ्यांदा उतरण्याचा प्रयत्न करत होतं, मात्र वैमानिकाकडून कोणतंही सिग्नल पाठवण्यात आलं नव्हतं असं सांगितलं जात आहे.

**<><><>**

प्रसारभारतीच्या पीबी शब्द या व्यासपीठावर नोंदणी करण्याचं आवाहन देशातली सर्व वर्तमानपत्रं, नियतकालिकं आणि दूरचित्र वाहिन्यांना करण्यात आलं आहे. या वृत्तसेवेत प्रसार भारतीच्या छापील बातम्या आणि दृकश्राव्य साहित्य विनामूल्य वापरता येईल. गेल्या वर्षीच्या मार्च महिन्यात सुरु झालेल्या पीबी शब्द या व्यासपीठाद्वारे दररोज ४० हून अधिक विविध क्षेत्रातल्या ८०० हून अधिक बातम्या विविध भाषांमध्ये प्रसारित होत असतात. या व्यासपीठावरुन अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय कार्यक्रमांच थेट प्रसारणही उपलब्ध असतं. याबरोबरच प्रसारभारतीकडे विविध घटनांचा समृद्ध ठेवा असून त्याचाही वापर नियतकालिकांना आणि वाहिन्यांना करता येणार आहे.

**//<><><><>//**